# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)**

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली — ४४२६०५ Email:- college.section@unigug.ac.in


जा.क्र/गो.वि./म.वि.वि.वि./4099 / २०२२ दि. 15 /१२/२०२२

## परिपत्रक

विषयः— पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी घडयाळी तासिका तत्वावर (सी.एच.बी.) शिक्षक नियुक्त करणेबाबत.

संदर्भः—१) दि. २९ ऑगस्ट, २०२२ रोजी संपन्न झालेल्या विद्या परिषद सभेच्या निर्णयानुसार.
२) परीपत्रक क्र./गो.वि./म.वि./२६४४/२०२२ दि. १०/०६/२०२२

विद्यापीठाशी संलग्नित ज्या महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू आहे अशा सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, दि. ०५/०५/२०२२ रोजी संपन्न झालेल्या विद्या परिषद सभेमध्ये झालेल्या निर्णयानुसार, विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात सुरू असलेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी नियमित शिक्षकांची नियुक्ती करण्याच्या अनुषंगाने शासन निर्णयाप्रमाणे महाविद्यालयाने कार्यवाही घेवून विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर करावा, नियमित शिक्षक न मिळाल्यास घडयाळी तासिका तत्वावर (सी.एच.बी.) शिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी, असे संदर्भ क्र. २ च्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते.

परंतु उक्तप्रमाणे झालेल्या निर्णयामध्ये, दि. २९ ऑगस्ट, २०२२ रोजी संपन्न झालेल्या विद्या परिषद सभेत झालेल्या निर्णयानुसार अल्पसा बदल केलेला असून, पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी नियमित शिक्षक न मिळाल्यास घडयाळी तासिका तत्वावर (सी.एच.बी.) एका विषयाकरीता एक शिक्षक नियुक्त करावे.

मा. प्र—कुलगुरू यांच्या मान्यतेने

13/12/22

( देवेंद्र एम. झाडे )
सहाय्यक कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रति,

मा. अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलिपी माहितीस्तव सादरः—

१. मा. कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२. मा. प्र—कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३. मा. कुलसचिव यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली